MHAH080020512022

**नियमित दिवाणी दावा क्र. ९२२/२०२२**
**निशाणी क्र. १६ वरील आदेश**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी त्यांच्या विरूध्द सदरहु दावा एकतर्फा चालविण्याचा दिनांक २४/०६/२०२४ रोजीचा हुकूम रद्यबादल होवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी अशी विनंती करतात की, त्यांना दावा मिळकती संदर्भातील रेकॉर्ड प्रतिवादींना वेळेत न मिळाल्याने व सन २०२२ मध्ये सदर दावा दाखल झाल्यानंतर प्रतिवादीच्या कुटुंबातील दोन नातेवाईकांचे आकस्मित निधन झाल्यामुळे प्रतिवादींना वकिलांशी संपर्क करुन तारखेची माहिती घेता आली नाही. तसेच, प्रतिवादींनी जाणीवपुर्वक न्यायालयात येण्यास उशिर केलेला नाही. प्रतिवादी हा जाणीवपुर्वक हलगर्जीपणा व निष्काळजीपणामुळे न्यायालयात हजर झाला नाही. सबब दाव्याचे कामकाज चालणे न्यायाचे दृष्टीने महत्वाचे आहे. सबब सदरहु हुकूम रद्य बातल व्हावा अशी तो विनंती करतो.

**०३.** वादी तर्फे विद्वान वकीलांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवुन अर्जास आक्षेप नोंदविला. ते असे नमुद करतात की, अर्जातील मजकुर खोटा, कारदेशीर नाही. प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी दावा लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने जाणिवपुर्वक उशीर करण्यात आला आहे. तसेच, अर्जात नमुद कारण संयुक्तिक नाही. वैकल्पिकरित्या अर्ज मंजुर करावा असे कोर्टाचे मत झाल्यास प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्यावर जास्ती जास्त खर्च लादण्यात यावा.

**०४.** मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा वादीने निरंतर मनाई हुकूम होवुन मिळणसाठी केला आहे. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्या विरुध्द सदरहु दावा एकतर्फा

चालविण्याचा झालेला हुकूम रद्द करणे न्यायोचित ठरेल. सदर प्रतिवादी यांनी सदरहु अर्जासोबत त्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व त्यामध्ये त्याने न्यायालयात हजर होणे कामी जाणुनबुजून उशिर केलेला नाही असे कथन केले आहे. माझ्या मते उपरोक्त प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तरी प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश त्याच्यावर जास्तीत जास्त दंड लादणे योग्य होईल. याउलट त्यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

**०१** प्रतिवादी क्र. १ ते ६ विरूध्द पारीत करण्यात आलेला दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश त्याच्यावर खर्च लादुन रद्यबातल करण्यात येतो.

**०२** प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी एकत्रित खर्च रक्कम रु. १०००/- (रूपये एक हजार) वादींना देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

GAIKWAD MOHINI JANU

Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2025.01.09 17:06:00 +0530

**(एम.जे.गायकवाड)**

दिनांक : ०९/०१/२०२५

५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
संगमनेर